| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br>**प्रेसनोट** | **2025**<br>**CB/21/2025** |

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक १५.०४.२०२५**

## ‘‘ बांगलादेशी नागरीकांना मदत करणा-या ०१ पुरुष व ०१ महिलेस नवी मुंबई गुन्हे शाखेने अटक करुन मेघालय पोलीसांच्या ताब्यात दिलेबाबत ’’

---

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, श्री.संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री.दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), नवी मुंबई यांनी पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अवैधरित्या राहत असलेल्या बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हददीतील वास्तव्यास असणारे बांगलादेशी नागरिकां विरुध्द सातत्याने कारवाईची धडक मोहिम राबविण्यात येत आहे. त्यामुळे बांगलादेशी नागरिक नवी मुंबई सोडून जात आहेत. मेघालय पोलीसांनी नवी मुंबई सोडुन गेलेल्या व मेघालयात अवैधरित्या वास्तव्य करीत असलेल्या २० बांगलादेशी नागरिकांवर कारवाई केलेली आहे.

अटक केलेल्या बांगलादेशी नागरिकांना नवी मुंबईतील इसम नामे जबीर युनुस शेख व महिला नामे नुसरत अर्शद काझी दोन्ही रा.कोपरखैरणे, नवी मुंबई यांनी बॅंक खाते उघडण्यासाठी मदत केल्याचे व त्यावरुन आर्थिक व्यवहार केल्याचे निष्पन्न झाल्याने मेघालय पोलीसांचे पथक त्यांना अटक करणेकामी नॉन बेलेबल वॉरंट घेवून नवी मुंबई येथे आले होते.

गुन्हे शाखा कक्ष-१ वाशी व अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष यांचे संयुक्त पथकाने वरिल बांगलादेशी नागरिकांना मदत करणारे आरोपींचा तांत्रिकरित्या व गोपनीय बातमीदारांमार्फत शोध घेवुन, दिनांक १३/०३/२०२५ रोजी दुपारी १२:०० वा.चे सुमारास महिला नामे नुसरत अर्शद काझी, रा. प्लॉट नं –१८/१९, सेक्टर १२ बी .कोपरखैरणे, नवी मुंबई या ठिकाणी वास्तव्यास असल्याची माहिती मिळाल्याने ताब्यात घेतले, तसेच इसम नामे जबीर युनुस शेख, हा रुम नं. ३०४, डिव्हाईन इंम्पेरिअल, प्लॉट नं २५०, सेक्टर- १९, उलवे या ठिकाणी राहत असलेबाबत माहिती मिळाल्याने त्यास दिनांक १५/०४/२०२५ रोजी ०१:०० वा.ताब्यात घेवून मेघालय पोलीस पथक यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

मेघालय पोलीस पथकाने त्यांचे मा.न्यायालयाकडुन ट्रांझीट वॉरंट प्राप्त करुन त्यांना पुढील तपासकामी घेवुन गेले आहेत.

सदर कारवाई सहा. पोलीस आयुक्त, अजयकुमार लांडगे, गुन्हे शाखा, व सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/ निरज चौधरी, गुन्हे शाखा कक्ष-१, वपोनि/ पृथ्वीराज घोरपडे, AHTU, सपोनि/ अलका पाटील, पोउपनि प्रशांत कुंभार, पोहवा/बांगर, पोहवा/ चव्हाण, मपोहवा/ विशे, पोशि/सावरकर, पोशि/ ठाकूर, पोशि/ कोलते यांनी केली आहे.

**नवी मुंबई पोलीस आयुक्तालमार्फत जनतेला आवाहन करण्यात येते की, ‘‘ अवैध बांगलादेशी नागरीक यांना घर भाडयाने दिल्यास/ कामावर ठेवल्यास संबधीत घरमालक, बांधकाम अथवा इतर व्यवसाईक आणि परदेशी नागरीकांना मदत करणा-या इतर व्यक्तींवर परकीय नागरीक कायदा कलम १४ (क) तसेच रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्ट १९३९ कलम ५ अन्वये कारवाई करण्यात येवुन त्यांना सहआरोपी करण्यात येईल.’’**

★★★★★★★★★★